# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३५८-२२ दिनांक २८/११/२०२२

## रात्रीच्यावेळी घरातील मौल्यवान वस्तू चोरुन नेणाऱ्या आरोपीतास नवघर पोलीसांनी केले जेरबंद.

दिनांक २०.११.२०२२ रोजी फिर्यादी श्री इरफान अब्दुल करीम शहा वय-२४ वर्षे रा-भाईंदर-पुर्व यांनी नवघर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली की, फिर्यादी हे दिनांक १९/११/२०२२ रोजी रात्री १२.०० वा कामावरुन घरी आले व सुमारे ०२.०० वा. चे सुमारास त्यांच्या घराचा दरवाजा बंद न करता झोपुन गेले. त्यानंतर फिर्यादी यांचा लहान भाउ हा सकाळी- ०५.३० वा चे सुमारास त्याचे कामावरुन घरी आला तेव्हा त्याला घराचा दरवाजा उघडा असल्याचे दिसुन आले तेव्हा त्याने घरात येवुन पाहिले असता त्यांच्या घरातील कपाटाचा दरवाजा देखील त्यास उघडा दिसला. त्यावेळी त्याने फिर्यादी व घरातील इतरांना उठवले व त्यांनी मिळुन घरातील वस्तुंची पाहणी केली असता त्यांच्या घरातुन कोणीतरी अज्ञात इसमाने तीन मोबाईल फोन, रोख रक्कम व एक सोन्याची चैन असा एकुण-१,२४,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल चोरी करुन नेला होता. सदरबाबत त्यांनी नवघर पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन I गुरनं ९०३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३८० प्रमाणे नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीताचा शोध होणेकरिता वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार नवघर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन पाहणी केली असता एक २० ते २५ वर्षे वयाचा अनोळखी संशयित इसम घटनास्थळाचे आजुबाजुस संशयितरित्या फिरत असताना दिसुन आला. त्यानंतर सदर आरोपी याचा भाईंदर-पुर्व, भाईंदर-पश्चिम, भाईंदर रेल्वे स्टेशन, बांद्रा-पुर्व, खार-पश्चिम, नालासोपारा-पश्चिम या परिसरात शोध घेतला असता सदर गुन्हयातील आरोपी नामे अंकुश गणेश गव्हाणे वर्षे रा-रिसोड, जि-वाशिम राज्य-महाराष्ट्र हा रिलायबल कॉम्पलेक्स, नालासोपारा पश्चिम येथे फिरत असताना मिळुन आला. सदर आरोपीयास दिनांक २१/११/२०२२ रोजी अटक करुन त्याच्याकडे पोलीस कोठडी दरम्यान तपास केला असता त्याने चोरी केलेले वेगवेगळ्या कंपनीचे एकुण-१० मोबाईल फोन व रोख रक्कम रुपये-५,०००/-असा एकुण-६७,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपी याच्याकडे केलेल्या तपासा दरम्यान हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलबाबत तपास करुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन त्याबाबत आधिक तपास चालु आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मिलिंद देसाई, श्री सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजित लांडे, पोह-०७०९७/भुषण पाटील, पोह-०४००४/गणेश जावळे, पोह-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोह-०००२०/जयप्रकाश जाधव, पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/ सुरजसिंग घुनावत, पोशि-१७०४६/विनोद जाधव यांनी केलेली आहे.

--------------ooooo--------------